
# "आरंभशूरा: खलु भारतीया:"

जयंत नारळीकर



१९६५ सालची हकिगत. भारत सरकारच्या आमंत्रणावरून मी भारत दौऱ्यावर आलो होतो. (त्या वेळी माझे वास्तव्य आणि संशोधन केंब्रिज विद्यापीठांत चालू होते.) भारतात मी अनेक विद्यापीठांत, संशोधनसंस्थांत आणि महाविद्यालयांत जाऊन माझ्या संशोधनावर आणि एकंदरीत खगोलशास्त्रातील त्या वेळच्या महत्त्वाच्या घडामोडींवर सोप्या भाषेत माहितीपर व्याख्याने देण्याचा प्रयत्न केला.

माझ्या त्या दौऱ्याला वृत्तपत्रांतून, आकाशवाणीवरून व इतर प्रकारे बरीच प्रसिद्धी मिळाली. त्या वेळी झालेल्या कोतुकाने आणि सत्कार-समारंभांनी मी संकोचून गेलो होतो व होत असलेल्या स्तुतीला मी पात्र नाही याची जाणीव सतत मनाला होत होती. अशा पार्श्वभूमीवर एक बोधपद घटना नमूद करावीशी वाटते.

पुणे विद्यापीठाला भेट देत असताना तेथील भौतिकशास्त्र विभाग प्रमुखांनी इमारतीच्या छपरावर नवीन बसविलेल्या दुर्बिणीचे उद्घाटन माझ्या हस्ते करविले. त्या हकिगतीवर भाष्य करताना 'महाराष्ट्र टाइम्स'च्या संपादकाने आपले मत व्यक्त केले की एका उद्घाटनासारख्या औपचारिक समारंभात, संशोधनात गुंतलेल्या शास्त्रज्ञाने वेळ खर्च करावा हे योग्य नाही.

स्तुतिसुमनांच्या पार्श्वभूमीवर हे परखड विचार मला अधिक जाणवले. आणि त्या वेळेपासून मी निश्चय केला की उद्घाटन, मग ते कशाचेही असो, करायचे नाही.

उद्घाटनाचा प्रकार हा मला मनापासून आवडत नाही व त्यामागची भूमिका अशी : उद्घाटन म्हणजे कुठल्या तरी प्रकल्पाच्या सुरुवातीची नांदी. ज्या अर्थी उद्घाटन समारंभ करून जगाला त्या प्रकल्पाची जाणीव करून द्यायची असते, त्या अर्थी तो प्रकल्प (आयोजकांच्या दृष्टीने) महत्त्वाचा असणार. तेव्हा असा महत्त्वाचा प्रकल्प पुढे चालू राहील, योग्य तऱ्हेने आपले उद्दिष्ट पूर्ण करेल यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

परंतु वस्तुस्थिती वेगळीच दिसते. गाजावाजा करून मोठ्या समारंभात 'मोठ्या' व्यक्तीकडून पायाभरणी करणे, फीत कापणे, समई पेटवणे इत्यादी करून घेतले जाते. त्यात वेळ, पैसा आणि शक्ती इतक्या प्रमाणात खर्च होते की त्या प्रकल्पाचे पुढे काय झाले इकडे कोणाचेच लक्ष नसते. मोठ्या समारंभाने उदघाटन केलेल्या इमारतींना दोन-तीन वर्षांत देखरेखीअभावी अवकळा येते. जोमाने सुरू केलेल्या व्याख्यानमालेत सुरुवातीची व्याख्याने झाल्यावर पुढे चालढकल सुरू होते. एखाद्या बाळाचे बारसे थाटाने करावे पण त्याच्या संगोपन-शिक्षणाकडे दुर्लक्ष असावे अशा तऱ्हेची ही परिस्थिती आहे.

वैज्ञानिक परिसंवादांची गोष्ट पहा. ते जर विद्यापीठांत भरवले तर त्यासाठी भलामोठा उद्घाटन समारंभ लागतो. कुलगुरू, कुलसचिव ह्या बड्या धेंडांपासून स्टेजचा पडदा ओढणाऱ्या-पर्यंत सर्वांचे आभार मानायचा कार्यक्रम होतो. ‘दोन शब्द’ बोलणारे व्यासपीठाचे अनेक मानकरी आपली बोलण्याची हौस भागवून घेतात. कसलीही वैज्ञानिक निष्पत्ती नसलेला हा कार्यक्रम दोन-तीन तास चालतो. परिसंवादासाठी वेळ खर्च करून आलेल्या सदस्यांना त्यांच्या चर्चेसाठी हाच वेळ किती तरी उपयोगी पडला नसता का? तसेच कुलगुरू, कुलसचिव वगैरेंचा कामाचा वेळ अशा समारंभात फुकट जातो त्याचे काय?

वैज्ञानिकांना वेळेची किंमत माहीत असूनही प्रत्यक्षात असे घडते तर इतरांचे काय? वृत्तपत्रांत पहा. किंवा दूरदर्शनच्या बातम्यांत पहा. उद्घाटनांची आणि तशाच इतर औपचारिक समारंभांची रेलचेल दिसते. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील एका मंत्र्यांनी झोपडपट्टीच्या संडासाचे उद्घाटन केले असे वाचले. असे समारंभ आवश्यक आहेत का? उद्घाटनाशिवाय प्रकल्प चालू शकत नाहीत का? आणि उद्घाटनानंतर तरी तो चालू रहातो का?

लंडनच्या रॉयल इन्स्टिट्यूशनमध्ये गेल्या शतकात डेव्ही व फॅरडे ह्या शास्त्रज्ञांच्या काळापासून विज्ञानावर सुबोध व्याख्याने व प्रात्यक्षिके दाखविण्याची परंपरा आजही टिकून आहे. उद्घाटन झाले की नाही, झाले तर कोणाकडून झाले, ह्यापेक्षा त्यानंतरच्या परंपरेला महत्त्व आहे हे आपण आरंभशूर भारतीय केव्हा शिकणार?

१९६५च्या घटनेनंतर मी स्वतः टाकलेले निर्बंध असे आहेत : १. उद्घाटन करायचे नाही. (हे स्पष्ट सांगूनहीं काही आयोजक अयत्या वेळी फीत आणि कात्री पुढे करून अडचणीत टाकतात.) २. कुठल्याही औपचारिक समारंभात वक्ता म्हणून जायचे नाही. (त्यामुळे शाळा-कॉलेजांच्या वर्षदिनांच्या समारंभांवर माझा बहिष्कार असतो. अशा समारंभात श्रोते मंडळींचा ‘मूड’ वक्त्याचे ‘दोन शब्द’ ऐकण्याचा नसतो हे अजून कोणाच्या लक्षात आलेले दिसत नाही!) ■